माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १२३/२०२५**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. दुर्योधन दौलत शहारे, मु. कोदामेंडी पो. बाम्हणी/सावंगी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया | ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया | सहाय्यक अभियंता, श्रेणी – २, पंचायत समिती, सडक/अर्जूनी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया |

## सुनावणी दिनांक २३.०३.२०२६

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १६७४/२०२२ मध्ये दिनांक १८.१२.२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

सदर तक्रारीवर आज दिनांक २३.०३.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी म्हणून सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, सडक/अर्जूनी, श्री. पी. एफ. बन्सोड उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १६७४/२०२२ मध्ये दिनांक १८.१२.२०२४ रोजी पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

१) "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोच देय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही, त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट ग्रामपंचायत, कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांचे विरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा

त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही, तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी." या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आला होता.

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक २२.०३.२०२५ (प्राप्त दि. २४.०३.२०२५) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी " दिनांक १८.१२.२०२४ ला माझ्या अपील अर्जाची सुनावणी घेवून जन माहिती अधिकाऱ्याला माहिती देण्याकरीता पुन्हा १५ दिवसाची मुदत घेवून तसे आदेश पारीत केले. परंतु आज दिनांकापर्यंत त्यांनी मला माहिती दिली नाही. करीता शास्तीचे आदेश कायम ठेवून कलम नं. १९ (ब) व कलम नं. २०(१) नुसार कारवाई करण्यात यावी" असे नमूद करुन तक्रार अर्ज केला आहे.

तक्रारकर्ता यांच्या दिनांक २२.०३.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी – २, पंचायत समिती, सडक/अर्जूनी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. १२३/२०२५/तक्रार शाखा/२०६५, दिनांक २९.०४.२०२५ अन्वये तक्रारकर्ता यांनी आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. १६७४/२०२२ संदर्भात आयोग कार्यालयात दिनांक १८.१२.२०२४ रोजी सुनावणी होऊन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशास अनुसरुन व तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल आयोग कार्यालयास त्वरित सादर करण्यात यावा, असे कळविण्यात आले होते.

मात्र, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी – २, पंचायत समिती, सडक/अर्जूनी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणताही अहवाल आयोगास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

**युक्तीवाद/खुलासा:-** आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही आणि पत्रव्यवहार सुध्दा केलेला नाही. तसेच आयोगाचे आदेश होवूनही त्यांनी आयोगाच्या आदेशानुसार अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, सडक/अर्जूनी, श्री. पी. एफ. बन्सोड यांनी या प्रकरणाबाबत आयोगासमक्ष कोणतेही भाष्य करु शकले नाही.

**निष्कर्ष**:- आयोगाचे उपरोक्त व्दितीय अपील क्र. १६७४/२०२२ मध्ये दिनांक १८.१२.२०२४ रोजी दिलेले अंतरिम आदेश दिनांक १८.०२.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने आयोगासमक्ष पुनश्च: दिनांक ०९.१२.२०२५ रोजी सुनावणी घेवून "जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत, कोदामेडी/केसलवाडा, पो. ब्राम्हणी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीबाबत अवलोकन करण्यासाठी ग्रामपंचायत कोदामेंडी येथे बोलाविण्यात आले होते. परंतु अपिलार्थी माहिती अर्जाच्या अनुषंगाने अवलोकन करण्याकरीता उपस्थित झाले नाही, असे खुलाश्यात नमूद करण्यात आले आहे. तसेच आज सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थी यांना ७ दिवसात माहिती प्रदान करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यानुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या दिनांक २२.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार कार्यालयातील उपलब्ध माहिती त्यांना नोंदणीकृत पोच देय डाकेने विनामुल्य पुरवावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी." असे आदेशित करुन प्रस्तुत द्वितीय अपील अंतिमत: निकाली काढण्यात आले होते.

मात्र, सदर प्रकरणात आयोगाचे उपरोक्त आदेश अंतिम होवून देखील विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास आजपावेतो माहिती पुरविण्याची कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच दिनांक ०९.१२.२०२५ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ७ दिवसात माहिती पुरविण्याचे आश्वासन आयोगास दिले होते. परंतु त्या आश्वासनाचे देखील आजपावेतो पालन केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे आयोगाने दिनांक ०९.१२.२०२५ रोजी पारीत अंतिम आदेशाची अंमलबजावणी का केलेली नाही? याबाबतचा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांच्याकडून खुलासा मागविणे क्रमप्राप्त ठरत आहे.

आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा आयोगास कोणतीही लेखी सूचना न देता अनुपस्थित आहेत. प्राधिकरणाच्या अनुपस्थितीबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा. मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर संबंधित तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी त्याचप्रमाणे इतर संबंधित अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता व्दितीय अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहील्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल," असे नमूद केले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा मागविणे आवश्यक ठरते.

संबंधीत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांनी द्वितीय अपील क्र. १६७४/२०२२ मध्ये दिनांक ०९.१२.२०२५ रोजी पारीत केलेल्या अंतिम आदेशाचे काटेकोरपणे पालन करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास १५ दिवसात सादर करणे अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
नागपूर

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांनी द्वितीय अपील क्र. १६७४/२०२२ मध्ये दिनांक ०९.१२.२०२५ रोजी पारीत केलेल्या अंतिम आदेशाचे काटेकोरपणे पालन करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत कोदामेंडी/केसलवाडा, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया यांनी आयोगाच्या दिनांक ०९.१२.२०२५ रोजीच्या अंतिम आदेशाची अंमलबजावणी का केलेली नाही? याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही, तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन कलम माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३) आज रोजी सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी आयोगाचा बहुमूल्य वेळ वाया घालविला आहे. **महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासकीय परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र-(२२२/२०१५) सहा. मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ०१.१२.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार** आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर सर्व सार्वजनिक प्राधिकरणास उपस्थिती बंधनकारक राहील असे सुचित करण्यात आलेले आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबतची नोंद घेवून त्यांच्या अनुपस्थितीचा अहवाल सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत आयोगात व्यक्तीश: हजर राहून सादर करावा.

४) या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** २३.०३.२०२६

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जा.क्र. 3840 दि. 28 APR 2026